# अत्याचाराचा प्रयत्न करणाऱ्याला कोठडी

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** पर्वती पायथा परिसरात अल्पवयीन मुलीवर अत्याचाराचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला शुक्रवारपर्यंत (८ मे) पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश विशेष न्यायाधीश एम. जी. चव्हाण यांनी दिले आहेत.

पर्वती पायथा परिसरात एका अल्पवयीन मुलीवर नात्यातीलच एकाने अत्याचाराचा प्रयत्न केल्याची घटना मंगळवारी रात्री उघडकीस आली. या प्रकरणातील आरोपीला बुधवारी (६ एप्रिल) सायंकाळी विशेष न्यायाधीश एम. जी. चव्हाण यांच्या न्यायालयात हजर करण्यात आले. पर्वती पोलीस ठाण्यातील गुन्हे शाखेच्या निरीक्षक अनिता हिवरकर यांनी या गुन्ह्याच्या अनुषंगाने न्यायालयास माहिती दिली.



## प्रकरण काय?

- पर्वती पायथा परिसरात एका अल्पवयीन मुलीवर अत्याचाराचा प्रयत्न केल्याची घटना मंगळवारी रात्री उघडकीस आली. या घटनेनंतर परिसरात संतप्त पडसाद उमटले. संतप्त नागरिकाने आरोपीला चोप देऊन पोलिसांच्या ताब्यात दिले. त्याला अटक करण्यात आली.
- या घटनेनंतर मोठ्या संख्येने नागरिक जमल्याने तणाव निर्माण झाला होता. अनुचित घटना घडण्याची शक्यता विचारात घेऊन या भागातील पोलीस बंदोबस्तात वाढ करण्यात आली. बुधवारीही या परिसरात बंदोबस्त होता.

'आरोपीने मुलीवर अत्याचाराचा प्रयत्न केला. त्या अनुषंगाने त्याची वैद्यकीय तपासणी करायची आहे. आरोपीने अशा प्रकारचे कृत्य यापूर्वी केले आहे का, या दृष्टीने तपास करायचा असल्याने तीन दिवस पोलीस कोठडी देण्यात यावी,' अशी विनंती सरकारी वकील अरुंधती ब्रह्मे यांनी युक्तिवादात केली. आरोपीच्या वतीने विधि सेवा प्राधिकरणाचे वकील ए. ए. जीवने यांनी बाजू मांडली. न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर आरोपीला शुक्रवारपर्यंत (८ मे) पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.

# चंद्राकडे बोट दाखवणाऱ्यांचं बोट कुणी पाहातं का?

## आक्षेप खोडण्यासाठी व्हेनिस बिएनालेच्या प्रमुखांचा आटापिटा

व्हेनिसनामा

अभिजीत ताम्हणे

**युद्धखोर देशांच्या** राष्ट्रीय दालनांचा समावेश असल्यामुळे यंदाच्या व्हेनिस आर्ट बिएनालेसंदर्भात उद्भवलेल्या वादांचा समाचार घेण्याचा सूर बुधवारी बिएनालेच्या आयोजक संस्थेचे अध्यक्ष पिएत्रांजेलो बुटाफुओको यांनी पत्रकारांसमोर लावला. चंद्राकडे बोट दाखवणाऱ्यांच्या बोटाकडे कोणीच पाहात नाही- लोक चंद्राकडेच पाहाणार; अशा शब्दांत त्यांनी वाद विरणारच आणि लोक कलाकृतींकडेच पाहाणार, असा ठाम दावा केला!

पण या काव्यात्म उपमेनं पत्रकारांचं समाधान होणार नाही, म्हणून त्यांनी- आम्ही कलेची स्वायत्तता जपतो आहोत, असंही सांगितलं तिथं मात्र ते फसले... कारण, आम्हाला आमची स्वायत्तता जपू दिल्याबद्दल आम्ही इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांचे ऋणी आहोत, हेही त्यांना म्हणावंच लागलं. एक प्रकारे, आमच्या संस्थेची स्वायत्तता सरकारवर अवलंबून असल्याची कबुलीच त्यांनी दिली.

मेलोनी यांचं राजकारण रशियाला न दुखावण्याचं आहे आणि इस्त्रायलसमर्थक अमेरिकेलाही त्या सांभाळू पाहातात, हे उघड आहे. त्यामुळेच अक्षरशः चोरासारखं रशियाच्या दालनाचं उद्घाटन व्हेनिस बिएनालेच्या जार्दीनी भागात मंगळवारीच उरकण्यात आलं. बिएनालेचे यंदाचे पूर्वदिन ( प्रिव्ह्यू डेज) ६ ते ८ मे असे ठरलेले असूनसुद्धा रशियासाठी नियम मोडला गेला. हाच नव्हे; तर व्हेनिस बेटाच्या आकाशात एकही विमान नको, हा ऐन दुसऱ्या महायुद्धातही पाळला गेलेला ( तेव्हाचा अलिखित, आता लिखित ) नियमही रशियाच्या देशदालनाला सुरक्षा पुरवण्यासाठी म्हणून मंगळवारी संध्याकाळभर घिरट्या घालणाऱ्या ड्रोनमुळे जरासा मुरडला गेला. विशेषतः व्हेनिस आणि इटलीच्या कलाबाजारावर रशियन धनिकांचा किंवा पुतिन यांच्या मर्जीतल्या ऑलिगार्क धेंडांचा वरचष्मा असल्याची कुजबुज एरवी असतेच, ती खरी वाटावी इतकं रशियाचं 'संरक्षण' व्हेनिस बिएनालेत यंदा सुरू आहे.



**व्हेनिस बेटावरच्या बिएनालेसह अन्य कला महोत्सव भरवणाऱ्या ला बिएनाले डिसेंबर व्हेनेझिया या संस्थेचे प्रमुख पिएत्रांजेलो बुटाफुओको.**

### आफ्रिका, महिला यांची यंदाच्या बिएनालेवर छाप

- रीना सैनी कलाट, हिमाली सिंग, सोहराब हुडा, अमर कन्वर, अनिश कपूर, नलिनी मलानी... शिवाय 'इंडिया पॅव्हिलियन'मधले आणखी पाच दृश्यकलावंत मिळून दहा भारतीयांचा समावेश यंदाच्या व्हेनिस बिएनालेत असला तरी प्रभाव दिसतो आहे तो आफ्रिकेचा आणि महिला दृश्यकलावंतांचा. यंदाच्या ६१ व्या महाप्रदर्शनाच्या दिवंगत गुंफणकार कोयो कुओ या आफ्रिकी कलेच्या पुरस्कर्त्या आणि सिनेगलच्या रहिवासी. त्यांनी अकाली निधनापूर्वीच काही सहकाऱ्यांसह १०५ दृश्यकलावंत आणि पाच कलासमूह यांची निवड मध्यवर्ती प्रदर्शनासाठी केली, त्यांत आफ्रिकेच्या किंवा अश्वेतवर्णीयांना संधी अधिक मिळाली आहे. कोयो यांनी या बिएनालेची मध्यवर्ती कल्पनाच 'इन मायनर कीज' (याचं अतिढोबळ भाषांतर - 'किनऱ्या सुरांत') अशी मांडल्यामुळे महिलांना इथं प्राधान्य असणार हेही स्पष्ट झालं होतं.
- महत्त्वाचं म्हणजे, व्हेनिस बिएनालेवरचा युरोपीय ताबा जणू पुसला जातो आहे, तो आशियाई, आफ्रिकी, लॅटिन अमेरिकी देशांकडे सरकतो आहे, हे २०१५ पासून दिसू लागलेलं चित्र आता पक्कं झालं आहे. कोयो कुओ या व्हेनिस बिएनालेच्या १८९५ पासूनच्या इतिहासातल्या पहिल्याचआफ्रिकी महिला गुंफणकार. त्यांच्या आधी २०१५ मध्ये ओक्वी एन्वेझर हे मूळ आफ्रिकी गुंफणकार होते आणि त्यांच्यामुळे इब्राहीम महामा आणि सॅमी बालोजी यांसारख्या तेव्हाच्या तरुणांना व्हेनिस बिएनालेत संधी मिळाली होती.


**निविदा सूचना**

तलासरी नगर पंचायत, जि. पालघर

मुख्याधिकारी, तलासरी नगर पंचायत यांच्यातर्फे स्वच्छ भारत अभियान २.० मधील माहिती शिक्षण व संवाद या घटक अंतर्गत तलासरी नगर पंचायत हद्दीतील भिंतीची रंगरंगोटी व इतर कामे करणेबाबत या कामासाठी दि. ०७.०५.२०२६ ते दि. १४.०५.२०२६ रोजीपर्यंत ऑफलाइन निविदा मागविण्यात येत आहेत.

तरी इच्छुक निविदाधारकांनी शेवटच्या तारखेच्या आत कार्यालयात सादर करावी व अधिक माहितीसाठी आरोग्य विभागाशी संपर्क साधावा.

जा. क्र. १३५ दि. ०६.०५.२०२६

सही/-
प्र. मुख्याधिकारी
तलासरी नगर पंचायत, तलासरी



IDEMI

GOVERNMENT OF INDIA
Ministry of Micro, Small and Medium Enterprises
INSTITUTE FOR DESIGN OF ELECTRICAL MEASURING INSTRUMENTS, MUMBAI
वैद्युतिक मापन उपयंत्र अभिकल्प संस्थान, मुंबई

Government Certificate Course on Artificial Intelligence For **Pharmaceutical R & D**

Course Timing- 07.30 PM to 8.30 PM | ऑनलाइन ONLINE | Date- 20 to27 May 2026 Course Duration: 8Days

Venue : IDEMI, Swatantryaveer Tatya Tope Marg, Chunabhatti, Sion PO Mumbai - 400 022

Email ID: training@idemi.org Website: www.idemi.org

Fundamentals of AI in Pharmaceutical Sciences, Applications of AI in Drug Discovery & Pharma Industry, AI Tools for Research & Scientific Writing, Ethical Use of AI in Research, Future Impact & Challenges of AI in Healthcare, Top 30 tools for education, Research Excellence and productivity enhancement, Basic of Molecular modelling, Structure Based Drug Design, Homology Modelling Molecular Docking, Molecular Dynamic Simulation.

Fees 4000+18% GST (Fees are not refundable)

After successsful completion certificate will be issued.

हमें कॉल करें / Call us between 10 am to 6 pm

Contact: 9403566219,8007765693,9869087617


## शेवटच्या वेतनाच्या निम्मे निवृत्तिवेतन

**(पान १ वरून)** महाविद्यालये व कृषी विद्यापीठामधील कर्मचारी जे राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीचे सभासद आहेत व उपरोक्त अटींची पूर्तता करतील, त्या कर्मचाऱ्यांना त्या फेरफारासह सुधारित निवृत्तिवेतन लागू राहील. त्याचप्रमाणे जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांनाही लागू राहील.

सुधारित राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना स्वीकारलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना निवृत्तीच्या वेळी त्यांच्या 'पीएफआरडीए'मध्ये जमा झालेल्या अंशदानाच्या संचित निधीमधून प्राप्त होणाऱ्या ६० टक्के परताव्याची रक्कम अधिकाऱ्यांकडे जमा करावी लागणार आहे. या परताव्याच्या रकमा चलनाद्वारे सरकारजमा करायच्या आहेत. जर कर्मचाऱ्यांनी राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली अंतर्गत जमा झालेल्या संचित निधीमधून यापूर्वी रक्कम काढली असेल तर ती रक्कम १० टक्के व्याजासह सरकारजमा करावी लागणार आहे. अन्यथा उर्वरित रकमेवर निवृत्तिवेतन निश्चित करण्यात येणार आहे.

> राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना १५ दिवसांत अधिसूचना काढण्याचे आश्वासन देण्यात आले होते. आश्वासनाचा कालावधी संपण्याआधीच सरकारकडून शासन परिपत्रक काढण्यात आले. हे सरकारी कर्मचाऱ्यांच्या संपाचे मोठे यश आहे.
> **- विश्वास काटकर,** निमंत्रक, सरकारी, निमसरकारी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समिती

> सरकारकडून अटी व शर्तींचाही समावेश अधिक स्पष्टपणे करण्यात यावा. त्याचप्रमाणे स्वेच्छानिवृत्ती घेणाऱ्यांबाबतही या निर्णयात अधिक स्पष्टता येणे आवश्यक आहे.
> **- समीर भाटकर,** अध्यक्ष, राजपत्रित अधिकारी महासंघ

**योजनेची ठळक वैशिष्ट्ये**

- किमान निवृत्तिवेतन ७ हजार ५००. १० वर्षांपेक्षा कमी सेवेस निवृत्तिवेतन नसेल.
- अधिकारी/कर्मचाऱ्याच्या शेवटच्या वेतनाच्या ५० टक्के निवृत्तिवेतन व त्यावरील महागाई भत्त्यातील वाढ अनुज्ञेय राहील. कर्मचाऱ्यांची २० वर्षांपेक्षा कमी व १० वर्षांपेक्षा जास्त सेवा होऊन तो नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत असल्यास त्याला त्याच्या शेवटच्या वेतनाच्या आधारे, सेवेच्या प्रमाणात निवृत्तिवेतन दिले जाईल.
- निवृत्तिवेतनाच्या ६० टक्के इतके राहील व त्यावरील महागाईभत्ता वाढ देण्यात येईल.


murugappa

## CG POWER AND INDUSTRIAL SOLUTIONS LIMITED

CIN: L99999MH1937PLC002641
**Registered Office:** One Unity Center, Unit Nos. 1504-1508, Senapati Bapat Marg, Prabhadevi, Mumbai-400013, India **Tel No.:** +91 22 24237777
**E-mail ID:** investorservices@cgglobal.com **Website:** www.cgglobal.com

**EXTRACT OF STANDALONE FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND YEAR ENDED 31ST MARCH, 2026**

(₹ in crores)

| Sr No. | Particulars | Quarter ended 31.03.2026 Audited | Year ended 31.03.2026 Audited | Quarter ended 31.03.2025 Audited |
|---|---|---|---|---|
| 1 | Revenue from operations | 3128.50 | 11330.62 | 2563.40 |
| 2 | Net Profit for the period (before tax and exceptional items) | 546.65 | 1792.58 | 381.37 |
| 3 | Net Profit for the period before tax (after exceptional items) | 546.65 | 1757.01 | 381.37 |
| 4 | Net Profit for the period after tax (after exceptional items) | 411.56 | 1316.78 | 275.49 |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 411.54 | 1312.84 | 274.33 |
| 6 | Equity Share Capital | 314.99 | 314.99 | 305.78 |
| 7 | Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in Audited Balance Sheet | 7901.38 | 7901.38 | 3762.80 |
| 8 | Earnings Per Share (of ₹ 2/- each) (not annualised except for the year ended March) | | | |
| | (a) Basic | 2.61 | 8.42 | 1.80 |
| | (b) Diluted | 2.61 | 8.42 | 1.80 |

**EXTRACT OF CONSOLIDATED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND YEAR ENDED 31ST MARCH, 2026**

(₹ in crores)

| Sr No. | Particulars | Quarter ended 31.03.2026 Audited | Year ended 31.03.2026 Audited | Quarter ended 31.03.2025 Audited |
|---|---|---|---|---|
| 1 | Revenue from operations (for continuing operations) | 3441.76 | 12417.95 | 2752.77 |
| 2 | Net Profit for the period (before tax and exceptional items) (for continuing and discontinued operations) | 492.36 | 1663.75 | 383.64 |
| 3 | Net Profit for the period before tax (after exceptional items) (for continuing and discontinued operations) | 492.36 | 1628.18 | 383.64 |
| 4 | Net Profit for the period after tax (after exceptional items) (for continuing and discontinued operations) | 363.46 | 1198.68 | 274.26 |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 382.76 | 1271.07 | 282.90 |
| 6 | Equity Share Capital | 314.99 | 314.99 | 305.78 |
| 7 | Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in Audited Balance Sheet | 7655.49 | 7655.49 | 3538.17 |
| 8 | Earnings Per Share (of ₹ 2/- each) (not annualised except for the year ended March) (for continuing and discontinued operations) | | | |
| | (a) Basic | 2.32 | 7.72 | 1.78 |
| | (b) Diluted | 2.32 | 7.71 | 1.78 |

**Notes:**

1. The above is an extract of the detailed format of Quarterly / Year ended Standalone and Consolidated Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 as amended (the 'Listing Regulations'). The full format of the Quarterly / Year ended Standalone and Consolidated Financial Results are available on the websites of the Stock Exchanges (www.bseindia.com and www.nseindia.com) and Company's website (www.cgglobal.com).
2. The above audited Standalone and Consolidated Financial Results have been reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors at their respective meetings held on May 06, 2026. The statutory auditors have carried out audit of the Standalone and Consolidated Financials Results of the Company as required under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 as amended (the 'Listing Regulations').

For **CG Power and Industrial Solutions Limited**
**By order of the Board**
**Amar Kaul**
Managing Director & CEO
(DIN: 07574081)

Mumbai: May 06, 2026



**कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड**
(भारत सरकारचा उपक्रम)

**ई-निविदा आमंत्रण सूचना**

प्रधान मुख्य अभियंता, कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लि., आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदा द्वारे सिंगल बिड प्रणाली अंतर्गत पात्र कंत्राटदारांकडून खालील कामासाठी खुली निविदा मागवित आहेत. **कामाचे नाव:** नवी मुंबईतील नेरुळ, सीवूड्स (पश्चिम) येथील कोकण रेल विहारमधील टाईप IV व टाईप V अधिकारी निवासस्थानांमध्ये विद्यमान मोझॅक टाईल्स फ्लोअरिंग काढून त्याऐवजी विट्रिफाइड टाईल्स बसविणे. **निविदा सूचना क्र.: केआर-डब्ल्यू-09-2026-01. अंदाजित किंमत:** रु. 57,90,526/- जीएसटी वगळून. **बंद होण्याची दिनांक/ वेळ:** 28.05.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत ऑनलाइन ऑफर/बोली सादर करण्यासाठी. **पूर्णत्व कालावधी:** पाच महिने मान्सूनसह. मॅन्युअल ऑफर स्वीकारल्या जाणार नाहीत. तपशील/सहभागासाठी कृपया https://ireps.gov.in या संकेतस्थळास भेट द्या. दुरुस्तीपत्रक/परिशिष्ट केवळ याच संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील.



**दुरुस्ती सूचना**

**तणावग्रस्त कर्ज उघडकीच्या हस्तांतरणासाठीच्या खुल्या लिलाव प्रक्रियेच्या रद्द करण्याबाबत सूचना – मेसर्स राजेश एक्सपोर्ट्स लिमिटेड**

दिनांक 04.05.2026 रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या वृत्तपत्रातील जाहिरात तसेच त्याच दिनांकाच्या बोली प्रक्रिया दस्तऐवजाच्या संदर्भात, मेसर्स राजेश एक्सपोर्ट्स लिमिटेड (यापुढे **"कंपनी"** किंवा **"आरईएल"** असे संबोधले जाईल) यांच्या तणावग्रस्त कर्ज उघडकीच्या हस्तांतरणाबाबत, कर्जदात्याने प्रदान केलेल्या सर्व कर्ज सुविधांचे पूर्ण रोख तत्त्वावर, खुल्या लिलाव प्रक्रियेद्वारे आणि त्यानंतर स्विस आव्हान पद्धतीनुसार, **"जसे आहे जेथे आहे"**, **"जसे आहे जे काही आहे"**, **"जे काही आहे जसे आहे"**, **"जे काही आहे तेथे आहे"** आणि **"कोणत्याही आधाराशिवाय"** या अटींवर हस्तांतरण करण्याबाबत कळविण्यात येते की, कर्जदात्याने प्रस्तावित खुली लिलाव प्रक्रिया रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

**ठिकाण : बेंगळुरू**
**दिनांक : 7 मे 2026**

**स्वाक्षरी/-**
**द्वारा निर्गमित**
**कॅनरा बँक, एलसीबी , बेंगळुरू**



**मिरा भाईंदर महानगरपालिका**

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता. ठाणे – ४०११०१ दूरध्वनी क्रं. २८१९२८२८

**पाणीपुरवठा व मलनि:सारण विभाग**

जा.क्र.मनपा/पा.पु. व मलनि/०२/२०२६-२७ दि. ०७.०५.२०२६

// निविदा सूचना क्र. ०२//

| | |
|---|---|
| कामाचे नाव :- | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध क्षमतेच्या १५ पाणी पंपिंग स्टेशनचे देखभाल व सर्वसमावेशक दुरूस्ती करणे. (अंदाजित रक्कम रु. ८,४१,०४,४३६/- GST वगळून) |

निविदा पूस्तिका ई-टेंडरींग (E-Tendering) संगणक प्रणालीच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. ०८.०५.२०२६ ते दि. १५.०५.२०२६ रोजी उपलब्ध होतील. तसेच दि. १५.०५.२०२६ रोजी १.०० वाजेपर्यंत निविदा स्विकारण्यात येतील व दिनांक १८.०५.२०२६ रोजी १२.३० वाजता उघडण्यात येतील.

कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी राखून ठेवला आहे.

जा.क्र.मनपा/मावज/जाहि./ई-८९१८७८३/२०२६-२७
दि. ०६.०५.२०२६
ठिकाण : भाईंदर
दिनांक : ०६.०५.२०२६

सही/-
(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका



**बृहन्मुंबई महानगरपालिका**
**मुंबई अग्निशमन दल**
**जाहीर आवाहन**

**उन्हाळ्यात आग प्रतिबंधासाठी मुंबई अग्निशमन दलाचे नागरिकांना आवाहन**

सद्य:स्थिती मुंबई शहरामध्ये वातावरणातील तापमान मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे दिसून येत आहे व उन्हाळा प्रखरतेने जाणवत आहे.

उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये वाढत्या तापमानामुळे घरांमध्ये, कार्यालयांमध्ये तसेच व्यापारी आस्थापनांमध्ये पंखे, एअर कुलर, एअर कंडिशनर, फ्रिज व इतर विद्युत उपकरणांचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. परिणामी विद्युत यंत्रणांवर ताण येऊन शॉर्टसर्किट, ओव्हरलोडिंग यांसारख्या कारणांमुळे आग लागण्याच्या घटनांमध्ये वाढ होण्याची शक्यता असते.

याशिवाय उष्ण व कोरडे वातावरण, ज्वलनशील पदार्थांची अयोग्य साठवणूक, कचरा जाळणे तसेच गॅस गळती यांसारख्या कारणांमुळेही आग लागण्याचा धोका वाढतो. ही बाब लक्षात घेऊन मुंबई अग्निशमन दलाने नागरिकांना सतर्क राहून आवश्यक खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.

१. नागरिकांनी घरातील व इमारतीतील विद्युत वायरिंग, स्विच बोर्ड आणि प्लग पॉइंट्स यांची नियमित तपासणी करावी.
२. एका प्लग पॉइंटमध्ये अनेक उपकरणे जोडून ओव्हलोडिंग टाळावे.
३. एअर कंडिशनर, कुलर इत्यादी उपकरणे वापरताना सुरक्षित व दर्जेदार विद्युत जोडणीचा वापर करावा.
४. घरात किंवा परिसरात कचरा, कोरडी पाने किंवा इतर ज्वलनशील वस्तू जाळू नयेत.
५. एलपीजी गॅस सिलिंडर व गॅस पाईपची नियमित तपासणी करावी.
६. प्रत्येक इमारतीतील, घरातील व निवासी / अनिवासी दालनातील अग्निशमन यंत्रणा कार्यरत स्थितीत ठेवाव्यात.
७. जिने तसेच आपत्कालीन बाहेर पडण्याचे मार्ग मोकळे ठेवावेत.
८. आपली वाहने निश्चित केलेल्या जागेत पार्क करा आणि अग्निशमन वाहनांच्या मुक्त व सुरळीत हालचालीसाठी आवश्यक तेवढी पुरेशी जागा मोकळी ठेवा.

कोणत्याही प्रकारची आग लागल्यास घाबरून न जाता तात्काळ मुंबई अग्निशमन दलाच्या 101 किंवा 23001390/23001393 या क्रमांकावर संपर्क साधावा.

उन्हाळ्याच्या काळात नागरिकांनी सतर्कता बाळगून योग्य खबरदारी घेतल्यास आग लागण्याच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात घट करता येईल व मोठया प्रमाणात होणारी जिवीतहानी व वित्तहानी टाळता येईल, असे मुंबई अग्निशमन दलाने स्पष्ट केले आहे.

PRO/259/ADV/2026-27

सही/-
प्रमुख अग्निशमन अधिकारी
मुंबई अग्निशमन दल

थोडासाही ताप येता, डॉक्टरांना जाऊन भेटा.



**सीमा शुल्क प्रतिबंधात्मक आयुक्तालय**
मुंबई कस्टम्स झोन -III
डिस्पोजल सेक्शन, रमेजिंग अँड इंटेलिजंस विंग, न्यू कस्टम्स हाऊस, बल्लार्ड ईस्टेट, फोर्ट, मुंबई-४०० ००१
ईमेल : disposal-prev@gov.in

**ई-लिलाव सूचना**

सीआरजीओ स्टिल शीट्स, ०१ लॉटच्या ई-लिलाव-नि-ई-निविदा क्र. MSTC/ WRO/ Customs Preventive/ 3/ Mumbai/ 26-27/ 6866 चे आयोजन "मेसर्स एमएसटीसी लि., ६०७ रहेजा सेंटर, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०००२१" द्वारा डिस्पोजल सेक्शन, आरअँडआय, न्यू कस्टम्स हाऊसद्वारा १४.०५.२०२६ रोजी करण्यात येणार आहे. लॉट्सचा सविस्तर तपशील (लिलाव कॅटलॉग्ज) www.mstcindia.co.in यावर उपलब्ध आहे. लॉट्सची पाहाणी त्यांच्या संबंधित ठिकाणी ११.०५.२०२६ रोजी दु. १२:०० वा. पासून ते दु. ०४:०० वा. पर्यंत करता येईल. सहभाग/ नोंदणी आणि अन्य शर्ती व अटींकरिता, www.mstcecommerce.com यावर लॉग-ऑन करावे किंवा संपर्क साधावा - सहाय्यक व्यवस्थापक, "मेसर्स एमएसटीसी", फोन नं. ०२२-२२८७२०११/ २२८८६२६१. विक्री झालेल्या मालाच्या पोचवणीनंतर तक्रारी डिपार्टमेंटद्वारा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

नरेश कुमार तिवारी यांच्याद्वारे डिजिटली स्वाक्षरीकृत
दिनांक : ०५.०५.२०२६
१८: २९: ३१

(नरेश कुमार तिवारी)
सीमा शुल्क (पी)चे उपायुक्त
डिस्पोजल, आरअँडआय, मुंबई झोन - III



**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सदस्यांची २ पदे (१ तांत्रिक पद) भरण्याबाबतची दिनांक ०७ मे २०२६ रोजी प्रसिद्ध केलेली जाहिरात www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तरी इच्छुक उमेदवारांनी त्यानुसार विहित मुदतीत अर्ज सादर करावेत.

ठिकाण : मुंबई
दिनांक : ०७ मे २०२६

सही/-
(सुचिता महाडिक)
सह सचिव, सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन

डीजीआयपीआर/२०२६-२७/५/सी६४६



**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण**
यांत्रिकी (डोंबिवली विभाग)
**निविदा सूचना क्र. ०५/२०२६-२७**

आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील १ कामाकरिता योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत/ अनुभवी कंत्राटदाराकडून ई-निविदा मागवीत आहे.
कोरे निविदा फॉर्म व निविदेबाबत सर्व अटी व शर्तींची माहिती महाराष्ट्राचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ७.०५.२०२६ ते १४.०५.२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहेत. निविदा ई-टेंडरिंग कार्यप्रणालीद्वारे दि. १४.०५.२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत भरता येतील. प्राप्त निविदा दि. १५.०५.२०२६ रोजी सायंकाळी ४.०० वाजता शक्य झाल्यास उघडण्यात येईल.
कोणत्याही कारणास्तव एक किंवा सर्व निविदा रद्द करण्याचा अधिकार आयुक्तांनी राखून ठेवला आहे. याबद्दलचा त्यांचा निर्णय अंतिम व सर्व निविदाधारकांना बंधनकारक राहील.
निविदेबाबतची अधिक माहिती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सही/-
अति. शहरअभियंता
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

जा.क्र.कडोंमपा/जसंवि/मुका/११०
दि. ०६.०५.२०२६



**बृहन्मुंबई महानगरपालिका**

प्र. अभि./इ.प./२०००/II दिनांकित ०६.०५.२०२६

**संक्षिप्त ई-निविदा सूचना**

| | |
|---|---|
| विभाग | प्रमुख अभियंता (इमारत परिरक्षण) |
| उप-विभाग | उप प्रमुख अभियंता (इमारत परिरक्षण) उपनगरे |
| निविदा क्र. | 2026_MCGM_1300397 |
| विषय | के/पूर्व वॉर्डमधील मरोळ, अंधेरी (पू.) येथील सागबाग हिंदू स्मशानभूमीची दुरूस्ती व सौंदर्यीकरण. |
| निविदा विक्री | ०७.०५.२०२६ रोजी स. ११.०० वा.पासून ते १५.०५.२०२६ रोजी दु. ०४.०० वा.पर्यंत |
| वेबसाइट | https://mahatenders.gov.in |
| संबंधित व्यक्ती | दुय्यम अभियंता (इमारत परिरक्षण) पश्चिम उपनगरे |
| नाव | संतोष जी. जाधव |
| टेलिफान क्र. | ८८७९९९१६३१ |
| ईमेल आयडी | se03ws.bm2@mcgm.gov.in |

स्वाक्षरी/-
पीआरओ/२७३/एडीव्ही/२०२६-२७ उप प्रमुख अभियंता (इ. प.) उपनगरे

झाडे लावा, झाडे जगवा.


## युद्धसमाप्तीसाठी नवा प्रस्ताव

**(पान १ वरून)**ते मुख्य माध्यम राहिले आहे. त्यामुळे इराणचे परराष्ट्र मंत्रालय लवकरच पाकिस्तानद्वारे आपला प्रतिसाद कळवेल, असे इराण परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्यांनी सांगितले. दोन्ही देशांतील सामंजस्य करारानंतर होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणाऱ्या जहाज वाहतुकीवरील बंदी उठवणे, इराणवरील अमेरिकेचे निर्बंध हटवणे आणि इराणच्या अणुकार्यक्रमावर निर्बंध घालण्यास सहमती दर्शवणे यावर चर्चा होईल, असे सूत्रांनी सांगितले.

सूत्रांच्या माहितीनुसार, ट्रम्प यांचे दूत स्टीव्ह विटकॉफ आणि जावई जॅरेड कुशनर या वाटाघाटींचे नेतृत्व करत आहेत. प्राथमिक करारावर सहमती झाल्यास, पूर्ण करारापर्यंत पोहोचण्यासाठी ३० दिवसांच्या सविस्तर चर्चेचा कालावधी सुरू होईल. दरम्यान, इराणचा अणू कार्यक्रम यांसारखे कठीण विषय बाजूला ठेवून युद्ध थांबवण्यावर भर दिला जात आहे.

तत्पूर्वी '२८ फेब्रुवारीला सुरू झालेले 'ऑपरेशन एपिक फ्युरी' आता संपले आहे', अशी घोषणा अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ यांनी मंगळवारी केली. त्याचवेळी इराणला त्यांच्या जागतिक एकाकीपणाची जाणीव करून द्यावी, अशी विनंतीही रुबिओ यांनी चीनला केली. पाकिस्तान सध्या अमेरिका आणि इराणमध्ये मध्यस्थी करत असून, चीनदेखील पाकिस्तानला यात मदत करत असल्याचे समजते.

### 'होर्मुझ' लवकरात लवकर खुली करा : चीन

**बीजिंग :** अण्वस्त्रे विकसित न करण्याच्या इराणच्या वचनबद्धतेचे स्वागत करत, चीनने बुधवारी इराणला हॉर्मुझची सामुद्रधुनी लवकरात लवकर खुली करण्याचे आवाहन केले आहे. चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांनी इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची यांच्याशी बीजिंगमध्ये चर्चा केली. 'होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारी वाहतूक पुन्हा सामान्य आणि सुरक्षित व्हावी, ही संपूर्ण आंतरराष्ट्रीय समुदायाची इच्छा आहे. इराणने या मागणीला लवकरात लवकर सकारात्मक प्रतिसाद द्यावा,' अशी चीनची अपेक्षा असल्याचे वांग यी म्हणाले.

### कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी घसरण

संभाव्य कराराच्या वृत्तामुळे जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत सुमारे ११ टक्के घसरण होऊन ती ९८ डॉलर प्रति बॅरलवर आली आहे. ऊर्जा पुरवठा सुरळीत होण्याच्या आशेने जागतिक शेअर बाजारातही बुधवारी तेजी पाहायला मिळाली.